**राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या वेगवेगळया केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला व अखर्चित असलेला निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पिय तरतूदीतून वितरीत करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन.

**आदिवासी विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७/प्र.क्र.०५/कार्यासन.६**

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

तारीख: २४ ऑक्टोबर, २०१७.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.६८/ अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/ अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७.
४) सार्वजनिक आरोग्य विभागाची नस्ती क्र. राआअ- २०१७/प्र. क्र. २२३/आ-०७.

**शासन निर्णय-**

आदिवासी उपयोजनांतर्गत मागणी क्र.टी-५ मधील २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-०६-सार्वजनिक आरोग्य- ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना--राज्य योजनांतर्गत योजना शिर्षाखाली राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या केंद्र पुरस्कृत योजना व कार्यक्रम याकरीता आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत (TCS) सन २०१४-१५, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला तथापि, अखर्चित राहिलेला रू.१०४४८.१३ लाख (अक्षरी रुपये एकशे चार कोटी अठ्ठेचाळीस लाख तेरा हजार फक्त) इतका निधी नियंत्रक अधिकारी तथा प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे..

(रू. लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नाव | लेखाशिर्ष (केंद्र हिस्सा) | एकुण अखर्चित देय रक्कम | सन २०१७-१८ ची अर्थसंकल्पिय तरतूद | वितरीत करावयाची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान | २२१० F७३८ | ९३६२.०० | २१५६४.७८ | ९३६२.०० |
| २ | राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान | २२१० F७४७ | ४७३.०० | १९१८.१० | ४७३.०० |
| ३ | राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम. | २२१० F७६५ | ५७.२० | १३८.०९ | ५७.२० |
| ४ | सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रम. | २२१० F७५६ | २२०.०९ | १७४०.५३ | २२०.०९ |
| ५ | राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम | २२१० F७९२ | १२६.४६ | ३६६.४९ | १२६.४६ |
| ६ | राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम | २२१० F८३६ | २६.९९ | ९५.९६ | २६.९९ |
| ७ | राष्ट्रीय वृध्दापकाळ आरोग्य शुश्रूषा कार्यक्रम | २२१० F८१८ | २९.७४ | ६१.०० | २९.७४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | कर्करोग,मधुमेह,हृदयरोग व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम | २२१० F८५४ | १०८.१७ | ५३७.८४ | १०८.१७ |
| ९ | राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम | २२१० F७८३ | १८.०९ | ९९.७१ | १८.०९ |
| १० | राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम | २२१० F८०९ | २६.३९ | ५५.७२ | २६.३९ |
| | **एकूण** | | **१०४४८.१३** | **२६५७८.२२** | **१०४४८.१३** |

२. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्राकरिता (TSP) उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर (OTSP) केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. १२८/ अर्थ- १९, दि. ०७-१०-२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२४१७५७११६१२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Kiran Kisanrao Pawar

Digitally signed by Kiran Kisanrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=68d8b19f123ba59448c0926a91296205b9a87463f831a2beea0be5cb381a34e8, serialNumber=344de3ff07b9439dd11caf728255a5eb0a0dd495ef82f989931088637d8211c0, cn=Kiran Kisanrao Pawar
Date: 2017.10.25 12:05:40 +05'30'

**( किरण कि. पवार )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
२) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र राज्य,मुंबई.
४) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६) महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७) विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ पुणे.
८) अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०) वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) सार्वजनिक आरोग्य विभाग (आरोग्य-७), मंत्रालय, मुंबई
१२) कार्यासन अधिकारी (का. ८ ), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.